**भूमि अभिलेख विभागातील भूकरमापक संवर्ग मृत घोषित करुन सदर संवर्ग परिरक्षण भूमापक संवर्गामध्ये समाविष्ट करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२१/प्र.क्र.४२/आस्था-६**
**पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : ०८ एप्रिल, २०२६**

**संदर्भ :-** मा.मंत्रीमंडळाच्या दि.०१.०४.२०२६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय.

**प्रस्तावना :-**

भूमि अभिलेख विभागात प्रामुख्याने जमिन मोजणी विषयक कामकाज केले जाते. ब्रिटीश काळात मूळ भूमापनाचे/जमाबंदीचे (Original Settlement) कामकाज हे शंकु साखळीच्या साहाय्याने करण्यात आले. त्यानंतर फलक यंत्र (Plane Table), थेडोलाईट मशिन (Theodolite Machine) याद्वारे मोजणी काम करण्यात आले आहे. तसेच Global Positioning System (GPS) व Satellite Imagery या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुद्धा राज्याच्या पुनर्मोजणी प्रकल्पात करण्यात आला आहे. विभागात सध्या अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या Rover व Base Station या उपकरणाच्या माध्यमातुन मोजणी कामकाज करण्यात येत आहे. वरील सर्व प्रकारच्या मोजणी कामात स्थापत्य अभियांत्रिकीतील गणितीय सुत्रे वापरात येतात. या मोजणी कामात भूमितीय व गणितीय (Trigonometrical) सुत्रांचा वापर करावा लागतो. मोजणीची कामे ही स्थापत्य अभियांत्रीकीतील Land Surveying या महत्वाच्या विषयाअंतर्गत येतात. अभियांत्रिकी महाविद्यालयांत Surveying व Advance Surveying हे विषय दोन वर्षे शिकविल्या जातात. तसेच AUTO-CAD या संगणकीय प्रणालीवर भूमापकांना काम करावे लागते. भूमि अभिलेख विभागातील कर्मचारी व शासनाच्या अधिपत्याखालील इतर विभागातील समकक्ष संवर्गातील कर्मचारी यांची वेतनश्रेणी समान नसल्याचे दिसून आले आहे.

भूमि अभिलेख विभागातील कर्मचारी तांत्रिक स्वरूपाचे कामकाज करतात त्यामुळे भूमि अभिलेख विभागातील कर्मचा-यांच्या सेवा प्रवेश नियमात बदल करून तांत्रिक शैक्षणिक अर्हता निश्चित केली आहे. त्याअनुषंगाने भूमि अभिलेख विभागातील गट-क संवर्गातील कर्मचा-यांना

सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्याबाबत मा.मंत्रिमंडळाच्या दि.०१.०४.२०२६ रोजीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**


महसूल व वन विभाग, शासन अधिसूचना दि.०२.०५.२०१४ नुसार भूमि अभिलेख विभागातील वर्ग ३ च्या कर्मचा-यांच्या सेवाप्रवेश नियमांममध्ये बदल करून तांत्रिक स्वरूपाची शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने भूमि अभिलेख विभागातील परिरक्षण भूमापक व परिरक्षण भूमापक (निवडश्रेणी) या स्तरांवरील पदांची सुधारीत वेतनश्रेणी व नियुक्तीचा मार्ग पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

१. भूमि अभिलेख विभागातील भूकरमापक संवर्ग मृत घोषित करण्यात येत आहे.

२. परिरक्षण भूमापक संवर्ग भूमि अभिलेख विभागातील गट-क संवर्गातील नियुक्तीचा प्रथमस्तर म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

३. सुधारीत आकृतीबंधानुसार भूकरमापक व परिरक्षण भूमापक या संवर्गामध्ये एकुण ६९३७ पदे मंजूर आहेत. भूकरमापक या मृत संवर्गातील सर्व पदे परिरक्षण भूमापक संवर्गामध्ये टप्प्याटप्प्याने समाविष्ट झाल्यानंतर परिरक्षण भूमापक हा एकच संवर्ग अस्तित्वात राहील. परिरक्षण भूमापक या संवर्गामध्ये परिरक्षण भूमापक व परिरक्षण भूमापक (निवडश्रेणी) हे दोन स्तर निर्माण करण्यात येत आहेत. परिरक्षण भूमापक या संवर्गामध्ये ४३६९ पदे निश्चित करण्यात येत असून या स्तरास एस-८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात येत आहे. तसेच उर्वरित २५६८ पदे परिरक्षण भूमापक (निवडश्रेणी) या स्तरामध्ये निश्चित करून या स्तरास एस-१२ ही वेतनश्रेणी लागू करण्यात येत आहे.

४. परिरक्षण भूमापक या संवर्गात पुढील नमूद केलेल्या मार्गाने उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल.



परिरक्षण भूमापक या पदावर उमेदवारांची नियुक्ती भूकरमापक या मृत संवर्गातुन नियमित पदोन्नतीने ४० टक्के, भूकरमापक / शिपाई या मृत संवर्गातून विभागीय परिक्षेद्वारे ४० टक्के आणि सरळसेवा (नामनिर्देशनाने) २० टक्के या प्रमाणात देण्यात येईल.

५. भूकरमापक या मृत संवर्गामधील पदावर सलग तीन वर्षे सेवा पूर्ण केलेल्या, सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण झालेल्या, सेवाप्रवेश नियम, नियुक्ती आदेशातील अटी व शर्तींची पुर्तता केलेल्या उमेदवारांमधून ४० टक्के च्या मर्यादेत परिरक्षण भूमापक संवर्गात पदोन्नती देण्यात येईल.

६. भूकरमापक/शिपाई या मृत संवर्गातून विभागीय परिक्षेद्वारे ४० टक्के च्या मर्यादेत परिरक्षण भूमापक संवर्गात पदोन्नती देण्यात येईल.

७. सरळसेवेद्वारे २० टक्के च्या मर्यादेत परिरक्षण भूमापक संवर्गात उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल.

८. भूकरमापक या मृत संवर्गातील ज्या प्रमाणात पदे कमी होतील (पदोन्नतीद्वारे / मर्यादित विभागीय परिक्षेद्वारे) त्याप्रमाणात परिरक्षण भूमापक या संवर्गातील पदांमध्ये वाढ होईल.

९. भूकरमापक या मृत संवर्गातील सर्व पदे पदोन्नतीद्वारे / मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे परिरक्षण भूमापक पदांमध्ये समाविष्ट होतील, त्यानंतर परिरक्षण भूमापक या संवर्गातील ८५ टक्के पदे सरळसेवेने (नामनिर्देशनाने) आणि १५ टक्के पदे (विहीत शैक्षणिक अर्हता धारण करणा-या) शिपाई संवर्गामधून पदोन्नतीने भरण्यात यावीत.

१०. शिपाई संवर्गातून पदोन्नतीकरीता विहित अर्हता धारण करणारे उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदोन्नतीचे प्रमाण शिथिल करुन परिरक्षण भूमापक या पदावर शासन मान्यतेने उमेदवारांची सरळसेवेने (नामनिर्देशनाने) नियुक्ती करण्यात यावी.

११. परिरक्षण भूमापक संवर्गातील कर्मचाऱ्यांची एकत्रित ज्येष्ठता यादी प्रादेशिक स्तरावर ठेवण्यात यावी.

१२. परिरक्षण भूमापक या संवर्गामध्ये परिरक्षण भूमापक व परिरक्षण भूमापक (निवडश्रेणी) हे दोन स्तर अस्तित्वात येणार आहेत. त्यातील परिरक्षण भूमापक या

स्तरातून २५६८ या मर्यादेत परिरक्षण भूमापक (निवडश्रेणी) स्तरामध्ये ज्येष्ठतेनुसार उमेदवारांना पदोन्नती देण्यात येईल.

१३. परिरक्षण भूमापक आणि परिरक्षण भूमापक (निवडश्रेणी) या दोन स्तरावरील पदांची कर्तव्य व जबाबदारी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, (महाराष्ट्र राज्य) पुणे हे निश्चित करतील.

१४. उपरोक्त प्रस्तावानुसार भूमि अभिलेख विभागातील गट-क संवर्गाचे सेवाप्रवेश नियम सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने सुधारीत करण्यात येतील.

**२.** सदर शासन निर्णय मा.मंत्रीमंडळाच्या दि.०१.०४.२०२६ च्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४०८१४४९०६२३१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ASHWINI BHIMRAO YAMGAR

Digitally signed by ASHWINI BHIMRAO YAMGAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=F0B627B3230194FA84BD0E5B4EB590E81C2C15CE998BA19F4825B4AC3EEE13CE, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1E31BE6F920A3D606925AB728A537257F35F1F0BE19B929C1B0DDCBA1E89366B, cn=ASHWINI BHIMRAO YAMGAR
Date: 2026.04.08 14:50:13 +05'30'

**(अश्विनी यमगर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.उप मुख्यमंत्री तथा मंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री तथा मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी) महसूल व वन विभाग
७. मा.अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१), मुंबई/महाराष्ट्र (२), नागपूर
९. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे
१०.उप सचिव (आस्था-१अ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
११.निवडनस्ती (आस्था-६)